Bharatiya Jain Sanghatana

# शांतिदूत

## कॉलेज वार्तापत्र

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
बकोरी फाटा, वाघोली, पुणे - ४१२ २०७
वर्ष २०१४-१५, अंक २, २६ जानेवारी २०१५
संपादक : प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे

### बीजेएस कॉलेजचा महास्वच्छता अभियानात सहभाग



वाघोली येथे महास्वच्छता अभियानात स्वच्छता करताना मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे व विद्यार्थी

वाघोली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत-सभ्य भारत-सुंदर भारत ही संकल्पना देशभर राबविण्याची घोषणा केली. त्यामुळे संपूर्ण देशातील शाळा-महाविद्यालयांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. वाघोली गावातील ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन संपूर्ण ग्रामस्वच्छाता करण्याचा ध्यास घेतला. जि. प. पुणेचे अध्यक्ष प्रदिपदादा कंद, वाघोली गावचे उपसरपंच रामभाऊ दाभाडे व इतर ग्रामपंचायत सदस्य यांच्याबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, डॉ. भूषण फडतरे, बीसीए समन्वयक प्रा. शिल्पा दंडे, प्रा. दिपाली काळे व १५३ स्वयंसेवकांनी या अभियानात सहभाग घेतला.

### पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या मैदानी स्पर्धा संपन्न



मैदानी स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंबरोबर बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रफुल्ल पारख, संस्थेचे वरिष्ठ समन्वयक शशी मनोत, मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, व इतर मान्यवर

वाघोली : पुणे जिल्हा क्रिडा विभाग आणि बी.जे.एस कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने पुणे जिल्हा आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धा शनिवार दि. १८ ऑक्टोबर ते सोमवार दि. २० ऑक्टोबर या कालावधीत बाबूराव सणस क्रीडांगण येथे संपन्न झाल्या. स्पर्धांचे उद्घाटन भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रफुल्ल पारख आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू भास्कर भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा क्रीडा विभागाचे अध्यक्ष आणि बीजेएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळाचे सदस्य शकूर सय्यद उपस्थित होते.

या स्पर्धेत २३ विविध क्रीडा प्रकारामध्ये पुणे जिल्हयातील ९१ महाविद्यालयातील ३९० स्पर्धक सहभागी झाले. या स्पर्धेतून पुणे जिल्हा क्रीडा विभाग संघाची निवड करण्यात आली. हा संघ विभागीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. स्पर्धेचे संयोजन जिल्हा सचिव, शारिरीक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड, यांच्यासह प्रा. अमेय काळे, प्रा. संतोष पाचारणे, प्रा. रावसाहेब गरड, प्रा. गिरीश ढमाले, प्रा. गणेश जाधव, सचिन कांबळे, प्रा. विवेकानंद टाकळीकर, तेजस जव्हेरी, आणि श्री. शशिकांत केसकर यांनी केले.

### बीजेएस कालेजला जुदो व बॉक्सींगमध्ये विजेतेपद



आंतर महाविद्यालयीन जुदो स्पर्धेतील विजेत्या खेळाडू बरोबर मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, शारिरीक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड, प्रा. तेजस जव्हेरी, प्रा. गणेश जाधव व विद्यार्थी

पिंपरीः घनमल उधराम वाणिज्य महाविद्यालय पिंपरी येथे पार पडलेल्या आंतरमहाविद्यालयीन जुदो स्पर्धांमध्ये भारतीय जैन संघटनेचे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयास मुले व मुली दोन्ही गटास विजेतेपद पटकावले. या स्पर्धा पुणे जिल्हा क्रिडा विभाग आणि मघनमल उधराम वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये पुणे जिल्हयातील महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सहभाग घेतला.



आंतर महाविद्यालयीन जुदो स्पर्धेतील विजेत्या खेळाडू बरोबर मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, डॉ. पद्माकर फड, प्रा. दिनेश सरोदे व विद्यार्थी

तसेच बीजेएस कॉलजने बॉक्सींग स्पर्धेत विजेते पद पटकावले. स्पर्धेमध्ये बीजेएस महाविद्यालयाच्या मुलींमध्ये अक्षदा जाधवराव, उज्वला झपके, दिपाली भांडवलकर, कावेरी रिकामे आणि मुलांमध्ये सचिन सावंत, गोपीचंद लोखंडे, रितेश कटके, सदाशिव साळुंके, अमर खराडे, स्वप्नील वाळके, अमित भंडारे या खेळांडूनी अतुलनीय कामगिरी दाखवली. डॉ. रमेश गायकवाड ,श्री गिरीष शहा यांनी स्पर्धेचे संयोजन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी सर्व खेळाडूंच्या अतुलनीय कामगिरीबद्दल अभिनंदन केले.

शांतिदूत संपादक मंडळ

संपादक - प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे
कार्यकारी संपादक - प्रा. डॉ. सहदेव चव्हाण
सदस्य - डॉ.भूषण फडतरे, प्रा.गणेश जाधव, प्रा.शिवाजी सोनवणे , प्रा. शोभा कोकाटे

### बीजेएस महाविद्यालयाला नॅकची' ब' श्रेणी



नॅक पीअर टीमचे चेअरमन डॉ. एस. सुदलायमुथ्यू, समितीचे समन्वयक प्राचार्य डॉ. उदयन सरकार, समितीचे सदस्य डॉ. हरिश शर्मा यांच्या समवेत मा. शांतिलालजी बोरा, मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, कॉलेजमधील नॅक समितीचे समन्वयक डॉ. ज्योतिराम मोरे व इतर मान्यवर

वाघोली:-भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयास नॅक पीअर टीमने दि. १५ ते १७ सप्टेंबर २०१४ या कालावधीत भेट देऊन पुनर्मुल्यांकन केले. नॅक पीअर टीमने पाठविलेल्या अहवालानंतर बेंगलोर येथील पुनर्मुल्यांकन समितीने महाविद्यालयाला 'ब' श्रेणी जाहीर केली. पुनर्मुल्यांकन पीअर टीममध्ये अलगप्पा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. सुदलायमुथ्यू यांनी टीमचे चेअरमन म्हणून काम केले. त्यांच्याबरोबर समितीचे समन्वयक प्राचार्य डॉ. उदयन सरकार, सदस्य हरिश शर्मा हे होते.

दहा वर्षापूर्वी बीजेएस महाविद्यालयास C++ श्रेणी मिळाली होती. महाविद्यालयाच्या गुणवत्तेत प्रगती होऊन आता 'ब' श्रेणी मिळाली. त्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शांतिलालजी मुथ्था, बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रफुल्ल पारख, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभयजी मुनोत, शालेय समितीचे प्रमुख शांतिलालजी बोरा, संस्थेचे सर्व विश्वस्त यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, कॉलेज मधील नॅक समितीचे समन्वयक डॉ. ज्योतिराम मोरे यांच्यासह सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थीवृंद यांचे अभिनंदन केले.

### एनएनएस मधून युवकांचे नेतृत्व घडते डॉ. बाबासाहेब सांगळे



एनएसएस शिबिरातील स्पर्धकांचा सत्कार करताना मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, सरपंच शिवाजी ढगे व इतर मान्यवर

आपटी येथे बीजेएस कॉलेजचे 'स्वच्छ भारत स्वस्थ भारत-समृध्द भारत' श्रमसंस्कार शिबिर संपन्न झाले. एनएनएस मध्ये विविध शाखांमधील विद्यार्थी एकत्र येतात. शिबिरात श्रमदान, प्रबोधन, सर्वेक्षण, पथनाट्य, सांस्कृतिक कला, स्वयंपाक करणे इत्यादी माध्यमातून सुप्त कलागुणांची आणि कौशल्याची ओळख होऊन ते विकसित होतात. यातून युवकांचे नेतृत्व घडते, असे मत भारतीय जैन संघटनेच्या (बीजेएस) कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी व्यक्त केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग बीजेएस महाविद्यालय आणि आपटी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आयोजित 'स्वच्छ भारत-स्वस्थ भारत- समृध्द भारत' या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून बोलत होते. हे शिबिर २ ते ८ डिसेंबर या काळात मु. आपटी, ता. शिरूर येथे आयोजित करण्यात आले होते.

सदर शिबिराचे उद्घाटन बीजेएस शालेय समितीचे अध्यक्ष मा. शांतिलालजी बोरा यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले की एनएनएस म्हणजे नक्की सुधारण्याची संधी. कॉलेज मधील शिक्षणाबरोबर या बिनभिंतीच्या शिक्षणाचे महत्व वेगळे आहे. आपटीचे सरपंच मा. शिवाजीराव ढगे यांनी उद्घाटन आणि समारोप प्रसंगी स्वागताध्यक्ष म्हणून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाधिकारी प्रा. महावीर श्रीश्रीमाळ, प्रा. सचिन कांबळे, प्रा. ज्योती आखाडे यांनी शिबिराचे संयोजन केले.

विनामूल्य वाटप करण्यासाठी शांतिदूत हे भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे वार्तापत्र संपादक प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी प्रकाशित करून कार्यकारी संपादक प्रा. सहदेव चव्हाण यांनी प्रसिद्ध केले. अंक सजावट व मुद्रण : श्री राज प्रिंटर्स मुद्रणालय, पुणे.

## सोशल मीडियाचा सुयोग्य वापर करावा. ॲड. रावसाहेब शिंदे



कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी ॲड. रावसाहेब शिंदे , बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रफुल्ल पारख, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभयजी मुनोत, मा. शांतिलालजी बोरा, प्राचार्य संतोष भंडारी;मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे व इतर मान्यवर

वाघोली : युवकांनी एनएनएस मधून स्वत:ला घडवताना सामाजिक भान जपावे. आपण कोणीही असलो तरी एक सामान्य माणूस असून समाजाचे देणे लागतो. आई ही समाज सेवेचे उपजत ज्ञान देते. ती त्याचे मुर्तीमंत उदाहरण आहे. तिच्यासारखे आपणही 'स्व'च्या कक्षेतून बाहेर पडायला हवे. सोशल मिडियाचा वापर समाजभान राखून करण्याचे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे यांनी केले.त्यानी महाविद्यायात रासेयो, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यामानाने आयोजित कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी मत व्यक्त केले. यावेळी बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रफुल्ल पारख यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. मा. अभयजी मुनोत, मा. शांतिलाल बोरा, प्रा. डॉ. बाबासाहेब सांगळे, मुख्याध्यापक श्री. संतोष भंडारी विद्यापीठ प्रतिनिधी सचिन खाडे यांच्यासह सहा महाविद्यालयातील ३५० युवक-युवती उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बाबासाहेब यांनी प्रस्ताविक, पाहुण्याचा परिचय डॉ. सिध्देश्वर गायकवाड यांनी तर आभार डॉ. किशोर देसर्डा व सूत्रसंचालन प्रा. महावीर श्रीश्रीमाळ यांनी केले.

## उपेक्षित लोकांच्या कार्यावर संशोधन होणे ही काळाची गरज : डॉ. सदानंद मोरे



राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्‌घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, प्राचार्य नंदकुमार निकम;डॉ. दिपक गायकवाड;डॉ. चंद्रकांत अभंग;मा. शांतिलालजी बोरा, मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, व इतर मान्यवर

वाघोली : महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळ ही एका वर्गापुरती मर्यादीत नसून त्यामध्ये जाती धर्मांच्या उपेक्षित लोकांनी घेतलेला सहभाग महत्वाचा असून अशा लोकांच्या कार्यावर संशोधन होणे ही काळाची गरज आहे असे मत ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. बीजेएस कॉलेज मध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चर्चा सत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. सदानंद मोरे,जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ लिमये उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. दिपक गायकवाड, प्राचार्य नंदकुमार निकम, श्री. शांतिलाल बोरा, प्राचार्य बाबासाहेब सांगळे,उपस्थित होते. यावेळी चर्चासत्रासाठी महाराष्ट्रातून आलेल्या शोधनिबंधांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. चर्चासत्रात डॉ. नामदेवराव ढाले, डॉ. राजेंद्र भामरे, डॉ. राजा दिक्षित, डॉ. चंद्रकांत अभंग यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भूषण फडतरे, तर सूत्रसंचालन प्रा. महावीर श्रीश्रीमाळ यांनी केले.

## बीजेएस कॉलेजमध्ये युवा सप्ताह उत्साहात साजरा



युवा सप्ताहाचे आयोजक रासेयो अधिकारी महावीर श्रीश्रीमाळ, प्रा. सचिन कांबळे, प्रा. पल्लवी दरेकर, प्रा. मनिषा बोरा, प्रा. शिल्पा दंडे, प्रा. कीर्ती आव्हाळे

वाघोली : भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांच्या १५१ व्या जयंती निमित्त युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. याचे उद्‌घाटन ८८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. दिपक बिचे यांनी युवकांपुढील आदर्श या विषयावर युवकांशी संवाद साधला. जेष्ठ अभ्यासक मा. सुनील चिंचोलकर यांनी भारत बलशाली होण्यामध्ये युवकांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. याशिवाय युवा सप्ताहामध्ये फोटोग्राफी, रांगोळी स्पर्धा आणि पाककृती स्पर्धा घेण्यात आल्या. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांच्या मार्गदर्शना खाली कार्यक्रमाधिकारी प्रा. महावीर श्रीश्रीमाळ यांनी संयोजन केले. त्यांना प्रा. सचिन कांबळे, प्रा. पल्लवी दरेकर, प्रा. ज्योती आखाडे यांचे सहकार्य लाभले. संयोजनात महेश भंडारे, किरण नाथ, आवलीराम कऱ्हे इ. स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

## बीजेएस कॉलेजमध्ये शेतकऱ्यासाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन



कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी श्री. गणेश फरताळे, मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे डॉ. देविदास पाटील व इतर मान्यवर

वाघोलीः शेतकरी बांधवांनी उद्योगशील दृष्टिकोन ठेवून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीसाठी केला तर एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही. शेतकरी बांधवांचा आर्थिक स्तर उंचावण्यसाठी शासनाने संवेदनाशीलता दाखवली पाहिजे. असे मत गणेश फरताळे यांनी बीजेएस कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या एकदिवसीय कार्यशाळेत व्यक्त केले. निसर्ग मंडळ व पर्यावरण संवर्धनासाठी पर्यावरणाविषयक घोषवाक्य स्पर्धा व पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे होते. त्यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट करताना समाजातील शेतकरी वर्गाची सद्य:परिस्थिती व पर्यावरण यांचा काळानुसार आलेख लक्षात घेता शेती तंत्रात बदल करणे आवश्यक असल्याची माहिती दिली. कार्यशाळेचे आयोजन डॉ. देविदास पाटील, डॉ. शोभना इनामदार, प्रा. चंद्रकांत गव्हाणे यांनी सहकार्य केले.

## 'बीजेएस कॉलेजमध्ये स्व. पी. सी. नहार मुक्तचिंतन आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा संपन्न'



वादविवाद स्पर्धेचे आयोजक सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. सुभाष शिंदे, महावीर श्रीश्रीमाळ, डॉ. ज्योतिराम मोरे, प्रा. कस्तुरी मते;प्रा. रोहिदास गोपाळे, प्रा. सुनिल ठाकरे व विद्यार्थी

वाघोली : स्व. पी. सी. नहार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मुक्तचिंतन आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन बीजेएस कॉलेजमध्ये करण्यात आले. महाविद्यालयीन निवडणूकांमधून निकोप नेतृत्व निर्माण होईल या विषयावर विविध महाविद्यालयातील संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्‌घाटन शालेय समितीचे अध्यक्ष शांतिलालजी बोरा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. पांडुरंग कंद व श्री. शंकर मुगावे यांनी काम पाहिले. अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब सांगळे होते. या स्पर्धेत सोनाई महाविदयालय अहमदनगर यांनी प्रथम क्रमांक, आण्णासाहेब मगर महाविद्यालय, पुणे यांनी द्वितीय क्रमांक तर तुकाराम पठारे कॉलेज चंदनगर यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.या स्पर्धेचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सुभाष शिंदे, प्रा. महावीर श्रीश्रीमाळ, प्रा. सहदेव चव्हाण, प्रा. सचिन कांबळे यांनी केले.

## माती आणि पाणी परीक्षण ही काळाची गरज – डॉ. कडलग



प्राध्यापक प्रबोधिनी समिती अंतर्गत व्याख्यानाच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. कडलग, मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे,प्रा. दिनेश गायकवाड,डॉ. एस. डी. गायकवाड, प्रा. मनिषा बोरा, डॉ. ज्योतीराम मोरे व इतर मान्यवर

वाघोलीः आज मोठ्या प्रमाणावर रासयनिक खतांचा वापर केल्याने माती नापीक होते तसेच भौगोलिक हानीमुळे भूजल पातळी खालावत आहे. माती व पाणी परीक्षण करणे ही काळाची गरज बनली. असे मत डॉ. कडलग यांनी प्राध्यापक प्रबोधिनी समिती अंतर्गत आयोजित केलेल्या व्याख्यानात व्यक्त केले.

डॉ. कडलग यांनी उपस्थित प्राध्यापकांना तसेच विद्यार्थ्यांना भूजल पातळी म्हणजे काय? ती कोणत्या कारणाने कमी होते? त्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबद्दल माहिती दिली. तसेच माती आणि पाणी परीक्षण या क्षेत्रात असणाऱ्या रोजगार संधीची माहिती करून दिली. अध्यक्षीय मनोगत डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनेश गायकवाड यांनी केले तसेच सूचसंचालन प्रा. गणेश जाधव यांनी केले तर डॉ. संजय गायकवाड यांनी आभार मानले.

## उपजत कौशल्याचा विकास होणे गरजेचे आहे. – डॉ. बाबासाहेब सांगळे



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विज्ञान शाखा प्रमुख डॉ. एस. डी. गायकवाड

वाघोली : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व भारतीय जैन संघटने कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने महाविद्यालयात दि. १९ डिसेंबर २०१४ ते १ जानेवारी २०१५ दरम्यान सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम (उपजत कौशल्याचा विकास) आयोजित करण्यात आला होता. या चाळीस तासांच्या प्रोग्राममध्ये महाविद्यालयातील एकूण दहा प्राध्यापक व प्राचार्य यांनी विविध विषायावर मार्गदर्शन केले या प्रोग्रामाचे उद्‌घाटन मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी केले व आरोग्याचे व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले.

या कोर्स करिता तृतीय वर्षे बी. सी. ए. मधील एकूण ५४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या कार्यक्रमाचे नियोजन प्रोग्राम समन्वयक डॉ. संजय गायकवाड व सदस्य डॉ. भूषण फडतरे, प्रा. सुभाष शिंदे प्रा. गणेश जाधव व प्रा. शिल्पा दंडे यांनी केले.

## माहिती तंत्रज्ञानातून नवी रोजगारनिर्मिती शक्य – विजय सुर्यवंशी



वाघोली : माहिती तंत्रज्ञानातील उच्च ज्ञानप्राप्ती केली तर रोजगारानिर्मिती बरोबरच युवकांमध्ये कौशल्याधिष्ठित गुणांची भर पडेल. समाजातील ज्ञानावर आधारित युवक तयार होण्यापेक्षा प्रात्यक्षिकातून ज्ञान निर्माण केले पाहिजे असे मत श्री. विजय सुर्यवंशी यांनी बीजेएस कॉलेज वाघोली येथील बीसीए विभागाने आयोजित केलेल्या व्याख्यानात व्यक्त केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन बीसीए समन्वयक प्रा. शिल्पा दंडे, जयश्री काळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार शुभम थिटे यांनी मानले.